महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक दुरुस्ती-०३१८/प्र.क्र.१४५/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ७ मे २०१८.

<u>विषय</u> :- पोलीस अधीक्षक, जालना, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, परतूर, येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी वसाहतीतील दुरुस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

<u>संदर्भ</u> :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ जालना-पो.ठा.-परतूर-रस्ता-व-नाली-बांध./ १०४/ २०१८, दिनांक २०.०३.२०१८.

<u>ज्ञापन.-</u>

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस अधीक्षक, जालना, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, परतूर, येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी वसाहतीतील दुरुस्तीची पुढील कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव उक्त पत्राव्दारे सादर करण्यात आला आहे:-

कामाचे नाव *(१)*	**खर्चाचे अंदाज** *(२)*
"Construction of cement concrete road and drain for Police Station and quarters premises at Partur, Taluka-Partur, Disrict-Jalna."	**रु.२६,७१,५५१/-**

२. उक्त कामासाठी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परतूर, यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केलेले रु.२६,७१,५५१/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले असून ते कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परतूर, आणि पोलीस अधीक्षक, जालना, यांनी सांक्षाकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.२७,४८,७८८/-** असे सुधारित केले आहेत व त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, जालना, यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, परतूर, येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी वसाहतीतील दुरुस्तीची, परिच्छेद १ मधील तक्त्यात स्तंभ (१) मध्ये नमूद केलेली कामे करण्यासाठी **रु.२७,४८,७८८/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये या अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) *(दत्तमत)* (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७६/इमा-२, दिनांक ०२.०४.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५०९१८४८२५३९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.09 18:49:57 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, औरगांबाद परिक्षेत्र, औरंगाबाद.
३) पोलीस अधीक्षक, जालना.

प्रत:-

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परतूर, जिल्हा-जालना *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) जिल्हा कोषागार अधिकारी, जालना.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).